सकाळी आईने संजयला उठविले. "मला बरे वाटत नाही. आज मी शाळेत जाणार नाही." संजय म्हणाला. आज तर त्याच्या वर्गाची सहल होती. आईने संजयच्या कपाळावर हात ठेवला. त्याचे अंग तापाने गरम झाले होते. पांघरायच्या चादरी अंगाभोवती घट्ट गुंडाळून तो झोपला होता. त्याला सारखा खोकला येत होता. आईने तापावरचे औषध आणले. एका चमच्यात ओतून संजयला दिले. गरम सूप खायला दिले. थंड पाण्यात भिजवलेल्या रूमालाने त्याचे कपाळ पुसले. नंतर जाड मोठे पांघरूण त्याच्या अंगावर घातले. संजयला आराम करायला सांगितले. आईने फोन केला की आज संजय आजारी आहे व तो शाळेत येणार नाही.

प्रश्न–

१) संजय का उठला नाही?

२) त्याला काय झाले होते?

३) आईने काय केले?

४) संजय शाळेत गेला का?

५) दवाखान्यात केंव्हा जायचे? का?

आज माझ्या ताईचे लग्न आहे. सगळेजण सकाळीच उठले. जिकडे तिकडे गडबड आणि धावपळ. आजीने व आईने नविन साडी घातली. बाबांनी नवा सदरा पायजमा घातला. डोक्यावर टोपी. मी पण नविन कपडे घातले होते. ताईने पिवळ्या रंगाची सुंदर साडी घातली होती. केसामध्ये छान छान फुले लावली. गळ्यात सोनेरी माळ घातली. तिच्या हातावर लाल लाल मेहंदी काढली होती. हातात हिरव्या बांगड्या घातल्या होत्या. एखाद्या राजाची मुलगी जशी राजकन्या तशी दिसत होती. बाहेर सगळे नातेवाईक लग्नासाठी आले होते. सगळे हसत खेळत गप्पा करीत होते. मी डावीकडे बघितले तर लाडू, चिवडा आणि चहा असा फराळ ठेवला होता. मी उड्या मारीत धावलो. हातात लाडू घेवून खाऊ लागलो.

प्रश्न–

१) कोणाचे लग्न होते?

२) कोणी काय काय कपडे घातले ते सांगा.

३) ताईने काय घातले होते?

४) ताई कोणासारखी दिसत होती?

५) तुम्ही मुंज किंवा लग्न पाहिले का? माहिती सांग.

---

आमच्या शाळेत "झाडे लावा" हा दिवस होता. दोन दोन मुलांचे, दोन दोन मुलींचे गट तयार केले. एका खोक्यात छोटी छोटी रोपटी होती. आम्ही सर्वजण बस मध्ये बसून एका नविन बागेत गेलो. माती उकरण्यासाठी एक खोचा दिला होता. तो जमिनीत खुपसून छोटा खड्डा करायचा मग त्यात रोपटे उभे करायचे. नंतर पायाने माती गोळा करून तो खड्डा भरायचा. झाडे लावताना दोन रोपट्यामध्ये मोजून ठराविक अंतर ठेवायचे. म्हणजे झाडे मोठी झाली की त्यांची मुळे चांगली पसरतात. झाडे लावल्या नंतर आम्ही त्या रोपट्यांना थोडे पाणी दिले. मला झाडे लावायला खूप मजा आली. एव्हढेसे छोटे रोपटे पण त्याचे किती मोठे झाड होईल. झाडांना पाने येतात. फुले येतात. फळे येतात. झाडे सावली देतात.

प्रश्न–

१) शाळेत आज काय विशेष होते?

२) झाडे कशी लावली?

३) झाडे जवळ जवळ का लावायची नाहीत?

४) झाडे आपल्याला काय देतात?

५) तुम्ही झाड लावले आहेस का? कोणते?

# सिंह आणि कोल्हा

एका जंगलात एक सिंह राहत होता. एकदा भुकेने व्याकूळ झालेला सिंह खूप हिंडला पण त्याला काही मिळाले नाही. कंटाळून तो एका मोठ्या गुहेत जाऊन बसला. गुहा बघून त्याने विचार केला की या गुहेत रात्री कोणी प्राणी विश्रांतीसाठी येईल. मग त्याच्यावर मस्त ताव मारता येईल.

ती गुहा होती कोल्ह्याची. थोड्या वेळातच तो आला. तेव्हा त्याचे लक्ष सिंहाच्या उमटलेल्या पावलांकडे गेले. क्षणभर थांबून कोल्ह्याने विचार केला, "सिंहाची पावले उमटलेली दिसत आहेत त्याअर्थी सिंह गुहेतच असणार. काय करावे?"

कोल्ह्याने युक्ती केली. तो जोरात ओरडला, "हे गुहे मी आलो की मी तुला हाक मारतो आणि तू नेहमी माझ्या हाकेला ओ देतेस. पण आज काही असे झाले नाही, बघ ह नाही बोललीस, तर मी दुसरी गुहा बघेन."

आतमध्ये लपलेल्या सिंहाला वाटले की आपल्यामुळे गुहा बोलत नसेल. आपण गुहेला बोलायला सांगू.... आणि सिंहाने गुहेला बोलायला सांगितले. सिंहाच्या डरकाळीने संपूर्ण जंगल हादरले. ती ऐकून कोल्ह्याने तिथून धूम ठोकली.

**प्रश्न-**

1. सिंह कश्यासाठी हिंडत होता?
2. कोल्ह्याला कसे कळले की सिंह गुहेत आहे?
3. कोल्ह्याने गुहेला काय सांगितले?
4. कोल्ह्याच्या युक्तीला सिंह फसला का?
5. सिंहाने गुहेला बोलायला सांगितल्यावर काय झाले?

---

# **परिच्छेद**

आम्ही माझ्या मैत्रिणीच्या वाढदिवसाला गेलो होतो. तेथे एक जादूगार आला होता. त्या जादुगाराजवळ खेळायचे पत्ते होते.

त्याने पत्त्यांच्या पुष्कळ जादू दाखवल्या. नंतर तो जादूगार लोकांमध्ये येऊन उभा राहीला. त्याच्या हातात एक टोपी होती. त्याने टोपी लोकांना हातात धरायला दिली. लोकांनी टोपीच्या आत हात फिरवून पाहिले. टोपीच्या आता काही नव्हते याची सर्वांना खात्री पटली.

नंतर जादुगाराने टोपीवरून एक साधी काठी फिरवली. कोणाला काही कळायच्या आत रिकाम्या टोपीतून कबूतर उडत बाहेर पडले. सर्वांनी जोरदार टाळ्या वाजवल्या.

प्रश्न-

1. जादुगार कुठे आला होता?
2. त्याने कोणत्या गोष्टी वापरून जादू दाखवली?
3. जादुगाराने लोकांना काय करायला सांगितले?
4. तुम्ही पाहिलेली एखादी जादू सांगा.
5. गोष्टीच्या शेवटी सर्वांनी टाळ्या का वाजवल्या?

# बादशहा आणि बिरबल

बादशहा, दरबारी मंडळी आणि बिरबल असे सर्व लोक एकदा यमुनेच्या वाळवंटात फिरायला गेले. बादशहाने यमुनेच्या स्वच्छ रेतीत हातातील काठीने एक रेषा काढली. नंतर बरोबरच्या मंडळीकडे पाहून तो म्हणाला, "या रेषेला अगदी थोडाही स्पर्श न करता, तिला लहान करून दाखवाल का?"

बिरबल वगळता सर्वजण म्हणाले, " खाविंद, ते कसे शक्य आहे?"

"त्यात अशक्य काय आहे?" बिरबल म्हणाला. बिरबलाने बादशहाने आधी काढलेल्या रेषेजवळच तिला समांतर अशी तिच्यापेक्षा लांब रेषा काढली. मग बिरबल म्हणाला, "खाविंद, पाहा बरे, मी काढलेल्या लांब रेषेमुळे तुमची रेषा एकदम लहान वाटू लागली, नाही का? शिवाय मी तुमची अट ही पाळली."

बिरबलाच्या या युक्तीवर बादशहा एकदम खूष झाला.

---

प्रश्न-

1. बादशहा आणि बिरबल कुठे फिरायला गेले?
2. बादशहाने यमुनेच्या रेतीत काय केले?
3. बादशहाने सर्वांना काय सांगितले?
4. बादशहाचे बोलणे ऐकून बिरबल काय म्हणाला?
5. बिरबलाने रेष लहान कशी केली?